# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ८०/२०२३

**विषय— दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजीच्या आयोजित विषयांच्या परीक्षांचे फेरनियोजन करण्याबाबत...**

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार ऑक्टोबर, २०२२ परीक्षा दिनांक २७/१२/२०२२ पासून चालू झालेल्या आहेत. सर्व विद्याशाखांतर्गत सर्व अभ्यासक्रमांचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर वेळोवेळी जाहीर करण्यात आलेले आहे व त्यानुसार सर्व परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीतपणे चालू झालेल्या आहेत.

अहमदनगर व नाशिक कार्यक्षेत्रातील काही महाविद्यालयाकडून परीक्षा विभागास प्राप्त पत्रानुसार नाशिक पदवीधर मतदार संघ निवडणूक दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी होणार असून याकरिता नगर व नाशिक जिल्हयातील नोंदणीकृत पदवी प्राप्त विद्यार्थी व शिक्षक मतदार म्हणून सहभागी होणार आहेत. याबाबत मा. अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून अहमदनगर व नाशिक कार्यक्षेत्रातील काही महाविद्यालये हे मतदान केंद्र म्हणून जाहीर केलेले आहेत.

सबब, उपरोक्त बाबींचा विचार करिता प्राप्त निर्देशानुसार आपणास कळविण्यात येते की, ऑक्टोबर, २०२२ परीक्षा मधील दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी आयोजित सर्व विषयांच्या परीक्षांचे फेरनियोजन रविवार दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२३ रोजी पूर्वीच्याच वेळापत्रकातील वेळेनुसार करण्यात येत आहे.

मा. प्राचार्य व महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकाचा आशय महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठ परीक्षा आयोजनात सहकार्य करावे.

संदर्भ :— परीक्षा—समन्वय/१६०
दिनांक:— २८ जानेवारी, २०२३

प्र. संचालक 28/1/23
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,